# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक 12/03/2024 (मंगळवार) सायंकाळ**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

## वाहनासह एकुण २५,३६,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक ११/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफ पोस्टे कुही हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, टिप्पर द्वारे अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतूक होत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मौजा उटी शिवार येथे नाकाबंदी करीत असताना टिप्पर क्र. एम. एच.— ४०/बी. एल ७३४५ आढळुन आले. स्टाफने वाहनास थांबवून पाहणी केली असता वाहनामध्ये अंदाजे ०६ ब्रास रेती ब्रास रेती मिळून आल्याने सदर चालकास टिप्पर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपींच्या ताब्यातून टिप्पर क्र. एम. एच.— ४०/ बी.एल— ७३४५ किंमती २५,००,०००/—रू. व ६ ब्रास रेती ३६,०००/—रू. असा एकुण २५,३६,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपी** नामे—**१) मोहन महादेव शिवरकर, वय ३० वर्ष, रा. गाधा ता. कामठी जि. नागपुर २) सचिन सुर्यभान फटीग, वय ३६ वर्ष, रा. पाचगाव** यांचेविरुद्ध पोस्टे कुही येथे कलम ३७९, १०९ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ अन्वये पो. स्टे. कुही येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कुही येथील पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके, पोलीस हवालदार हरीदास चाचरकर, पोलीस नायक सावरकर यांनी पार पाडली.

## ॲल्युमिनीअम तार चोरी करणारे आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

फिर्यादी नामे— प्रणय हरिभाउ झोड, वय २२ रा. धनी ता. मौदा हा सिक्युरीटी गार्ड म्हणुन काम करत असुन फिर्यादी हा डयुटीवर असतांना दि. ११/०३/२०२४ चे पहाटे ०३.३० वा. ते ०४.०० वा. दरम्यान जिओ ४ जी कंपनीमधील स्क्रॅप यार्डमधुन अंदाजे ४० ते ५० किलो ॲल्युमिनीयम तार दोन अनोळखी ईसमांनी चोरून नेल्याचे फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोस्टे मौदा येथे अप क्र. २८७/२४ कलम ३७९, ३४ भांदवि अन्वये गुन्हा नोंद केला होता.

सदर गुन्हयाच्या तपासा दरम्यान आरोपींचा शोध घेत असतांना मिळालेल्या गोपनीय माहिती नुसार एका मोटरसायकलवर दोन इसम हे चोरीचा मद्देमाल घेवुन तारसा रोडकडे जात आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून तारसा रोड येथे मौदा पोलीसांनी सापळा रचुन मोटरसायकल एम एच—३१/सी.सी—८९०८ वर असलेले **आरोपी नामे— रेखराम उर्फे विक्रांत जगण गणवीर वय ४५ वर्ष रा. दरदास नगर कामठी पेट्रोलपंपं जवळ २) भैयाप्रसाद कल्लु शाहू वय ३२ वर्ष रा. बारव्हा पोस्टे म्हतैन जि. सतनी म.प्र** यांना ताब्यात घेवुन त्यांची झडती घेतली असता त्यांच्या ताब्यातून ५० किलो ॲल्युमिनीअम तार किंमती ५०००/— रू. व गुन्हयात वापरलेली मोटरसायकल एम एच—३१/सी.सी—८९०८ किंमती २५,०००/—रू. असा एकुण ३०,०००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने त्याबाबत आरोपींना सखोल विचारपुस केली असता सदरचा चोरीचा गुन्हा केल्याबाबत कबुली दिली.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतिशसिंग राजपूत, पोलीस हवालदार संदीप कडु, पोलीस नायक दिपक दरोडे, पोलीस अंमलदार अतिश गाढवे यांनी पार पाडली.

## अवैधरीत्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक

दिनांक १२/०३/२०२४ ला पोलीस स्टेशन खापरखेडा परिसरात पेट्रोलींग, प्रोव्हीबिशन जुगार रेड कामी फिरत असतांना गुप्त बातमीदाराव्दारे माहीती दिली की, खापरखेडा रेल्वे चौकीजवळ असलेल्या भाईजान टी स्टॉल चे मागील बाजूस एक इसम माउझर बाळगुन आहे अशा खबरेवरून डी. बी पथक स्टॉप खापरखेडा रेल्वे चौकीजवळ असलेल्या भाईजान टी स्टॉल जवळ जावून कार्यवाही केली असता शाहरुख अत्ताऊल्ला पठाण वय ३१ वर्ष रा. बाजार चौक पारशिवनी हा सार्वजनिक ठिकाणी एक लोखंडी देशी माउझर (अग्निशस्त्र) ज्यास लोखंडी मॅग्झीन लागलेली बाळगुन मिळून आला त्या ताब्यात घेऊन विचारपुस केली असता त्याने सांगितले की, २५ ते ३० दिवसापूर्वी सुरज कावळे यांचेकडून ४०,०००/— रुपयात विकत घेतलेली असल्याचे सांगितल्याने त्यास अटक करून त्याचेकडुन माउझर जप्त करून पो.स्टे खापरखेडा अप. क. १४४/२४ कालम ३/२५, ५/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे आरोपी सुरज कावळे हा फरार असुन त्याचा शोध सुरु आहे

सदर कार्यवाही मा. पोलीस हर्ष पोद्दार सा, मा. अपर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ सा, उपविभागिय पोलीस अधिक्षक संतोष गायकवाड सा. यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार धनाजी जळक सा. पोउपनि भारती नरोटे, डी. बी पथक येथील पोलीस हवालदार प्रफुल राठोड, शैलेश यादव, पोलीस नायक राजु भोयर, मुकेश वाघाडे, राजकुमार सातुर महिला पोलीस नायक कविता गोंडाने यांचे पथकाने पार पाडली आहे.

# जलालखेडा पोलीसांची दमदार कामगीरी

आज दिनांक १२/०३/२०२४ रोजी जलालखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सपोनि सी. बी. चौहान, पोलीस अंमलदार पुरूषोत्तम धोंडे, निलेश खेरडे, दिनेश जोगेकर, फिरोज शेख, किशोर कांडेलकर व होमगार्ड सैनिकांच्या मदतीने पोलीस स्टेशन परिसरात विशेष मोहीमे दरम्यान ०५ वेगवेगळया ठीकाणी दारूबंदी कायद्यांतर्गत कारवाया करण्यात आल्या त्यामध्ये ग्राम – हिवरमठ, घोगरा, उमठा, पारधी बेडा उमठा या ठीकाणी एकुण १८० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ९०००/– रूपये चा मुद्देमाल तसेच जलालखेडा येथे सट्टापट्टी जुगार कायद्यांतर्गत ०१ कार्यवाही करण्यात आली व त्यामध्ये २३० रूपये नगदी व साहीत्य असा एकुण ९२३०/– रूपयाचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला व दारूबंदी व जुगार कायद्यांतर्गत गुन्हे नोंद करून पुढील तपास ठाणेदार सपोनि सी.बी. चौहान साहेब, यांचे मार्गदशर्नात निलेश खेरडे, फिरोज शेख, दिनेश जोगेकर हे करित आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष. ए. पोद्दार (पोलीस अधिक्षक सा. (नागपूर ग्रा), मा. अपर पोलीस अधिक्षक सा. मा. उपविभागीय पोलीस अधि. सा. (काटोल वि. काटोल) यांचे मार्गदर्शनात जलालखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सपोनि. सी.बी. चौहान साहेब व त्यांच्या पथकाने केली

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**